दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● बुधवार दि.१३ ऑगस्ट २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २५८ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Wednesday 13 August 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 258 ● Pages 4 ● Rate 4 Rs

प्रतिनिधी नेमणे आहे
लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा .

# बीडचा दिल्लीत डंका; खा.सोनवणेंच्या आक्रमक पावित्र्यामुळे सभागृह तहकूब

## केंद्रीय निवडणूक आयोगाच्या पक्षपाती कारभारावर चर्चा करण्याची केली मागणी

**बीड । प्रतिनिधी**

सोमवारी मतचोरीच्या विषयावरून इंडिया आघाडीने निवडणूक आयोगाच्या कार्यालयावर मोर्चा काढला होता. यावेळी बीडचे खा.बजरंग सोनवणे आघाडीवर दिसले. दरम्यान, मंगळवारी सभागृहात याच विषयावर खा. बजरंग सोनवणे यांनी जोरदार आवाज उठवला. या विषयावर संसदेत आवाज उठवणारे खा.सोनवणे हे पहिले सदस्य ठरले. त्यांच्या समर्थनार्थ इंडिया आघाडीच्या सर्व खासदारांनी घोषणाबाजी करत गदारोळ केला. अखेर, गोंधळ वाढल्याने लोकसभा अध्यक्षांना कामकाज बंद करून सभा तहकूब करावी लागली.

इंडिया आघाडी, ज्यामध्ये काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस-शरद पवार, राजद, भाकप (माले), शिवसेना (उबाठा), तृणमूल काँग्रेस आणि इतर पक्षांचा समावेश आहे. यांनी बिहारमधील मतदार याद्यांच्या विशेष व्यापक पुनरावलोकनाला तीव्र विरोध दर्शविला आहे. आघाडीचे म्हणणे आहे की हा उपक्रम गरीब, वंचित, अल्पसंख्याक आणि स्थलांतरित लोकसंख्येतील लाखो मतदारांना मताधिकारापासून वंचित ठेवण्याचा गंभीर धोका निर्माण करतो. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ दरम्यान निवडणूक आयोगाच्या पक्षपाती आणि लहरी कारभारामुळे, मतदान सुरू होईपर्यंत मतदार याद्यांमध्ये नवीन नावांचा समावेश करण्यात आला. या कारभाराचा थेट फायदा सत्ताधारी पक्षाला झाल्याचा आरोप खा. सोनवणे यांनी केला आहे. परिणामी, निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून देशभरात असंतोषाची लाट उसळली आहे. या असंतोषाच्या विरोधात कालपासून इंडिया आघाडीच्या ३०० पेक्षा अधिक खासदारांनी जोरदार शक्तीप्रदर्शन करत मोर्चा काढला. या मोर्चात खा.बजरंग सोनवणे यांनी ठळकपणे सर्वांचे लक्ष वेधले. संसद सभागृहाबाहेर जोरदार निदर्शने सुरू असतानाच आज सभागृहात या विषयावर खा.बजरंग सोनवणे यांनी जोरदारपणे आवाज उठवला. या विषयावर संसदेत आवाज उठवणारे खा.सोनवणे हे पहिले सदस्य ठरले. त्यांच्या समर्थनार्थ इंडिया आघाडीच्या सर्व खासदारांनी घोषणाबाजी करत गदारोळ केला. अखेर, गोंधळ वाढल्याने लोकसभा अध्यक्षांना कामकाज बंद करून सभा तहकूब करावी लागली.




### देशभरातील खासदारांचा पाठींबा

देशभरातील खासदारांनी खा.बजरंग सोनवणे यांच्या मागणीला पाठींबा दिला. यामुळे दिल्लीत बीडच्या खासदाराचा डंका पहायला मिळाला. आजवर अशाप्रकारे आक्रमकबाणा दिल्लीच्या सभागृहात बीडचा दिसला नव्हता. खा.सोनवणे यांनी सबंध देशाला बीडचा आक्रमक बाणा दाखवून दिला.

> “ महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ दरम्यान, निवडणूक आयोगाच्या पक्षापाती व लहरी कारभारामुळे मतदान सुरू होईपर्यंत मतदार याद्यांमध्ये नावांची भरती करण्यात आली. याचा थेट सत्ताधारी पक्षाला फायदा झाला. यामु आयोगाच्या स्वायत्तेवर गंभिर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आज संसदेत या विषयावर सर्वप्रमथ मीच आवाज उठविला. माझ्या समर्थनार्थ इंडिया आघाडी उतरली. लोकशाहीच्या रक्षणासाठी माझा लढा सुरूच राहिले.
>
> –खा.बजरंग सोनवणे, बीड

### परळीतील मतदार याद्यांमध्येही गडबडीचा केला आरोप

# निवडणूक आयोगावर राहूल गांधी यांनी केलेल्या आरोपांशी परळी काँग्रेस सहमत-बहादूर भाई

**परळी । प्रतिनिधी**

काांग्रेस नेते राहूल गांधी यांनी केंद्रीय निवडणूक आयोगावर केलेल्या आरोपांशी परळी काँग्रेस सहमत असल्याचे सांगत २०१९ पासून परळी विधानसभा मतदारसंघाच्या यादीतही मोठी गडबड असल्याचा आरोप परळी शहर काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादूर भाई यांनी आज दिनांक १२ ऑगस्ट रोजी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत केला. यावेळी त्यांनी परळी विधानसभा मतदारसंघातील झालेल्या गडबडीचे काही व्हिडिओ चित्रण पत्रकारांना दाखविले.

शहरातील नवीन व्हीआयपी रेस्ट हाऊस येथे बारा ऑगस्ट रोजी दुपारी एक वाजता शहर काँग्रेसच्या वतीने मतचोरी में हेराफेरी या काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या पत्रकार परिषदेचा काही भाग पत्रकारांना दाखविण्यात त्यानंतर काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादुर भाई पत्रकारांशी बोलताना म्हणाले की,परळीतील निवडणुकीत सुध्दां राहुल गांधी यांनी केलेल्या आरोपांसारखी झाली आहे. निवडणुकांमध्ये राज्य शासनाच्या अधिन कर्मचारी निवडणूक काम करतात. ते स्थानिक खासदार, आमदार,यांचेच ऐकतात आणि तसेच त्यांना अपेक्षित आहे त्याप्रमाणे कामकाज करतात.मग निवडणूक यादी बनविणारे बीएल.ओ.प्रशासनाच्या अंतर्गत काम करत असतात.तो प्रामाणिक पणे काम करत नाही.सदर बीएलओ स्थानिक नेत्यांच्या हवाली फार्म देतात आणि भरुन घेतात.



परळी शहरात प्रत्येक बुथवर १०० ते १५० अतिरिक्त मते असल्याचे सांगताना एकूणच मतदार यादीतील घोळ याबाबत त्यांनी स्पष्टीकरण दिले.साधारण दहा हजार मते बाहेरची जोडली गेली आहेत.भाजपा अनेक बाहेरील मतदारांचा वापर करते. आणि मतदानाच्या दिवशी या बाहेरील लोकांना परळीत आणले जाते.परळीतही असे अनेक बाहेरील मतदार दुपारी चार नंतर मतदान करतात.परळीत हे सर्व २०१९ पासून सुरू आहे.मतदार यादी मध्ये घोळ करण्याचे हे काम सत्ताधारी पक्षाकडील नगरसेवक, निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेले असे कार्यकर्ते हे काम करतात.मतदान कार्ड बाहेरील लोकांची बनवून घेतली जातात.मृत मतदारांचेही परळीत मतदान झाले निवडणूक आयोग ४५ दिवसांत डाटा डिलिट का करत आहे.सीसीटिव्ही फुटेज का देत नाही.असा सवालही बहादूर भाई यांनी आज केला.परळीत मतदाराऐवजी दुसरेच कार्यकर्ते बटन दाबत होते. प्रशासनही सत्ताधाऱ्यांना सहकार्य करते. विधानसभा निवडणुकीत फक्त २५ कॅमेरे चालू होते.बाकी बंद होते.निवडणूक अधिकारी यांना तक्रार केली परंतु काहीही फरक पडला नाही.आम्ही आतले नाही तर बाहेरचे कॅमेरे पाहतो. असे उत्तर अधिकाऱ्याकडून ऐकायला मिळाले त्यामुळे एकूणच निवडणुकीत कर्मचारी हा कोणाच्यातरी सांगण्यावरून काम करत होता हे दिसून आल्याचे ते म्हणाले.सध्या हा प्रश्न जनतेसमोर आल्यामुळे आम्ही परळीतील घडलेल्या प्रकाराची माहिति प्रकारांसमोर मांडत आहोत.निजामाबाद येथे नगर सेवक पदाची निवडणूक लढविणारा व्यक्ती याने परळीत मतदान केले.याचे आमच्याकडे पुरावे आहेत.परळीच्या मतदार यादीतही प्रशासनाच्या मदतीने घोळ केला जात आहे. डबल नावे टाकली जातात , हैदराबाद येथे मागील वीस वर्षांपासून राहणा-या व्यक्तीची परळीत नावे आहेत. ही सर्व नावे प्रशासनाने वगळावेत व अद्यावत कोणतेही गडबड नसलेले आणि घोटाळा नसलेल्या याद्या निवडणूक आयोगाने आगामी काळात प्रसिद्ध कराव्यात असे आवाहनही बहादुर भाई यांनी केले. या पत्रकार परिषदेला काँग्रेसचे प्रकाश देशमुख, गुलाब देवकर, रणजीत देशमुख, एत्तेशाम,सिरसाट आदी उपस्थित होते.

# गुंडांच्या मुसक्या आवळण्यासाठी पोलिसांची अनोखी ‘दिंड’

## शहादा शहरात पोलिसांचा खाक्या: महिलांची छेड काढणाऱ्या युवकाची धिंड काढून वठणीवर आणले



**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्ह्यातील शहादा शहरात वाढत्या गुंडगिरीला आळा घालण्यासाठी पोलिसांनी एक अनोखी मोहीम राबवली आहे. अनेक दिवसांपासून शहरात दहशत माजवून महिलांची छेड काढणाऱ्या एका युवकाला पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याची चक्क शहरातून धिंड काढली. या कारवाईमुळे सर्वसामान्य नागरिकांनी पोलिसांचे कौतुक केले असून, यापुढेही अशाच कठोर उपाययोजना करून गुंडगिरीला लगाम घालावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शहरातील मुख्य रस्त्यांवरून हात जोडून माफी मागत या आरोपीला फिरवण्यात आले. या कारवाईचा उद्देश गुंडांना जरब बसवून शहरात शांतता व सुव्यवस्था राखणे हा आहे. शहरातील वर्दळीच्या ठिकाणी या गुंडाची दिंड काढत पोलिसांनी शहरातील वातावरण खराब करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना कठोर इशारा दिला आहे.या कारवाईमुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेचे सर्वत्र कौतुक होत आहे. ही कारवाई गुंडांना एक स्पष्ट संदेश देते की, कायदा व सुव्यवस्था बिघडवणाऱ्यांची गय केली जाणार नाही. सर्वसामान्य नागरिकांनी पोलिसांच्या या धाडसी निर्णयाचे स्वागत केले असून, यामुळे शहरातील गुंडांना धडा मिळेल अशी भावना व्यक्त केली आहे. पोलिसांच्या या ‘दिंड’ मोहिमेमुळे शहरातील महिला आणि नागरिक सुरक्षित झाल्याची भावना निर्माण झाली आहे.

# तळोदा तालुक्यातील बोरद येथे मोबाईल दुकानासह हॉटेलमध्ये घरफोडी; ३३,५०० रुपयांचा ऐवज लंपास

**नंदुरबार । दिपक गोसावी**

शहरातील महालक्ष्मी मोबाईल पॉईंट आणि शेजारील नागाई नाश्ता हॉटेलमध्ये अज्ञात चोरट्यांनी घरफोडी केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेत चोरट्यांनी एकूण ३३,५०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे. तळोदा पोलीस ठाण्यात याप्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (अ), ३३१ (४) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.



फिर्यादी सुनील कैलास मोरे (वय ३५) यांनी दिलेल्या माहितीनुसार, बोरद येथील लाखापूर रोडवरील त्यांच्या मालकीच्या महालक्ष्मी मोबाईल पॉईंटचे दुकान शुक्रवार, ९ ऑगस्ट रोजी रात्री ९ वाजता बंद करण्यात आले होते. त्यानंतर, १० ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजता दुकान उघडले असता, त्यांना दुकानात चोरी झाल्याचे निदर्शनास आले. चोरट्यांनी दुकानातून विविध कंपन्यांचे एकूण ७ मोबाईल फोन आणि २५०० रुपयांची रोख रक्कम असा एकूण ३०,५०० रुपयांचा ऐवज लंपास केला. यात १२,००० रुपये किमतीचे दोन विवो मोबाईल, ४,००० रुपये किमतीचा एक रेडमी मोबाईल, ३,००० रुपये किमतीचे दोन केघोडा मोबाईल आणि ९,००० रुपये किमतीचे दोन रिअलमी मोबाईल फोन यांचा समावेश आहे.याचवेळी, शेजारील जितेंद्र राजेंद्र पाटील यांच्या नागाई नाश्ता हॉटेलमध्येही चोरट्यांनी पत्रा उचकावून प्रवेश केला. हॉटेलमधील गल्ल्यातून ३,००० रुपये रोख रक्कम आणि सुट्टे पैसे चोरून नेले. दोन्ही घटना मिळून एकूण ३३,५०० रुपयांचा ऐवज चोरीला गेला आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. तळोदा पोलीस अधिक तपास करत आहेत.

# नेताजी सुभाषचंद्र बोस ऑक्सिजन पार्कची निर्मिती

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

स्वा.रा.ती.महाविद्यालयात राष्ट्रीय छात्रसेनेने माय अर्थ माय ड्युटी अभियानांतर्गत १०१ वृक्ष लावून नेताजी सुभाषचंद्र बोस स्मृती ऑक्सिजन पार्कची निर्मिती केली आहे. यावेळी मेजर एस.पी. कुलकर्णी,छात्रसेना अधिकारी पाराजी शिंपले,सोनटक्के,प्रा. प्रवीण भोसले,सागर कुलकर्णी,ज्ञानेश्वर सोनवणे,भाऊराव मुंडे आदी उपस्थित होते.

छात्रसैनिकांनी श्रमदानाने स्वच्छता केली.त्या ठिकाणी वृक्षारोपणासाठी खड्डे खोदले तिथे चिंचबनची निर्मिती केले.या ठिकाणी ऑक्सिजनचा साठा होत आहे.या वृक्षाखाली विद्यार्थ्यांनी अभ्यास करून नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या सारखे मोठे देशभक्त व्हावे.श्रमदानाचे महत्त्व कळावे यासाठी १०१ वृक्ष लावून ऑक्सिजन पार्क तयार केला आहे. वृक्ष लागवडी बरोबरच त्यांच्या संगोपनाचाही निर्धार विद्यार्थ्यांनी केला आहे.



संपादकीय

# एस.टी.तोट्यात का? योग्य विचार व्हावा!

राज्याची जीवनवाहिनी म्हणून ओळखली जाणारी एस. टी. ही आर्थिक गर्तेत इतकी सापडली आहे, की कर्मचाऱ्यांना महिन्याला वेतन देणेही आता कठीण होत चालले आहे. त्यासाठी दर महिन्याला शासन दरबारी मदतीसाठी उभे राहावे लागत आहे. साधारणपणे १९९० नंतर एस. टी. महामंडळ तोट्यात जाण्यास प्रारंभ झाला व हा तोट्याचा आलेख चढताच राहिला आणि दुसरीकडे खासगी वाहतूकदारांच्या फायद्याचा आलेख मात्र चढताच राहिला. जर खासगी वाहतूकदार आपला व्यवसाय फायद्यात करू शकतात, तर एस. टी. महामंडळ तोट्यात का चालले आहे. याचा गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे.

एस. टी. महामंडळ फायद्यात चालावे अशी राज्य शासनाची मानसिकता असेल तर एस. टी. महामंडळाला पूर्ण स्वातंत्र्य देणे आवश्यक आहे. महामंडळावर राज्य शासनाचा अंकुश असावा पण हस्तक्षेप नको. चालक, वाहक आणि कर्मचारी यांच्या बदलीतही राज्य शासनाचा हस्तक्षेप असतो तो आता तरी बंद करावा त्यापेक्षा परिवहन विभाग आणि वाहतूक विभाग यांनी नियमांची अंमलबजावणी योग्य रीतीने आणि काटकोरपणे केल्यास राज्य शासनाला एस. टी. महामंडळाला अनुदान देण्याची गरज भासणार नाही. खासगी वाहतूकदारांना कोणतेही अनुदान नसताना ते जर आपला व्यवसाय फायद्यात करू शकतात तर एस. टी. महामंडळ आपला व्यवसाय फायदा नको, तर ना नफा, ना तोटा का करू शकत नाही याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. नुकत्याच घेतलेला भाडेपट्टा कराराचा कालावधी वाढवून ३ घेण्याच्या निर्णयामुळे फायदा सोडा, तोटा आणखीच वाढेल. त्यावेळी एस. टी.च्या जागा विकून एस. टी. महामंडळाचा तोटा कसा काय भरून निघेल हे एक कोडेच आहे.एस. टी. महामंडळ तोट्यात जाण्यासाठी अनेक करणे आहेत, प्रमुख्याने एस. टी.वरील संचालक मंडळ, प्रशासन, प्रादेशिक परिवहन विभाग आणि शासनाचा हस्तक्षेप या आहेत. एस. टी. महामंडळाच्या संचालकाची नेमणुका हे राज्यशासन करते. हे संचालक कोण असतात? तर ते राजकारणी नेत्यांचे हित-संबंधी व्यक्ती असतात. त्यांचा सार्वजनिक प्रवासी वाहतुकीचा अभ्यास किती असतो हा एक संशोधनाचा विषय असतो. १९६० पासून सुरुवातीच्या २५ ते ३० वर्षांच्या कालावधीत सन्मानाने आणि फायद्यात चालणारी एस. टी. तोट्यात का जाऊ लागली याचा कधी अभ्यास, विचार तरी कोणी केला का? की फक्त एस. टी. महामंडळाच्या कामाकरिता निघणाऱ्या निविदाचाच विचार केला गेला. एस. टी. फायद्यात चालवी म्हणून संचालक मंडळ काय प्रयत्न करते? याचा राज्य शासनाने त्यांना कधी जाब विचारला का? एस. टी. महामंडळ प्रामुख्याने प्रवासी आणि एस. टी. कर्मचारी यांच्यामुळेच चालते हे कोणीच नाकारू शकत नाही, म्हणून संचालक मंडळात किमान एक संचालक तरी प्रवाशांचा प्रतिनिधी असावा आणि एक संचालक एस. टी. कर्मचाऱ्यांचा प्रतिनिधी असावा. जेणेकरून त्यांचा अनुभवाचा आणि अभ्यासाचा उपयोग करून घेता येईल.दुसरी गोष्ट म्हणजे प्रशासन एस. टी.चे प्रशासकीय कामकाज एस. टी. मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक आणि सर्व महाव्यवस्थापक पाहतात, संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाने, सहकार्याने धोरणात्मक निर्णय घेतात. काही वर्षांपूर्वी एस. टी. महामंडळाचे अध्यक्ष हे सत्ताधारी पक्षाचे विद्यमान आमदार असायचे पण नंतर एखादेवेळी एस. टी.चे हित पाहून एस. टी.चे अध्यक्ष म्हणून परिवहन मंत्री, महाराष्ट्र सरकार यांचीच नियुक्ती केली जाऊ लागली. ती आजतागायत. हा राज्य शासनाने घेतलेला निर्णय योग्य की अयोग्य याचा विचार कारण्यांची आवश्यकता आहे. हा निर्णय घेतल्यापासून एस. टी.ची प्रगती झाली की अधोगती? त्यावेळेपासूनच एस. टी. तोटा वाढायला लागला, एस. टी.चा तोटा कमी करण्यासाठी बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा. एस. टी.चे भूखंड भाडेतत्त्वावर देणे, गाड्या भाडेतत्त्वावर घेणे यासारखे अनेक निर्णय घेऊन एस. टी. महामंडळ अधिकच अडचणीत आणि तोट्यात आले. एस. टी.चा तोटा कमी करण्यासाठी प्रवासी भाडे वाढ, भाडेपट्टाचा कालावधी वाढविणे असे पर्याय नसून वाढत गेलेला आर्थिक भ्रष्टाचार हे असून याचा अभ्यास करून त्यावर वेळीच उपाययोजना करणे गरजेचे आहे. परिवहन मंत्रीच एस. टी. अध्यक्ष असल्यामुळे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय, महाव्यवस्थापक आणि तत्सम अधिकारी आपले विचार, मत, सूचना किंवा निर्णय ठामपणे मांडू शकत नाहीत किंवा मांडत नाही. पूर्वी अध्यक्ष-उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाव्यवस्थापक आणि तत्सम अधिकारी एकत्रित धोरणत्मक किंवा निर्णय घेत, आवश्यक त्या ठिकाणी परिवहन मंत्री यांची मदत, मार्गदर्शन घेत. त्यामुळे कोणताही निर्णय घेताना सखोल अभ्यास व चर्चा व्हायची. आता वर वर विचार करून निर्णय घेतले जातात. आताचेच उदाहरण द्यायचे झाल्यास गणपती उत्सवात कोकणवासीय प्रवाशांकडून वैयक्तिक तिकीट घेतल्यास प्रवास भाड्यात १५% सवलत आणि ग्रुपधारक प्रवाशाला ३०% जादा प्रवासी भाडे, म्हणजे किरकोळ विक्रीवर सवलत, घाऊक विक्रीवर अधिभार, हे कोणते व्यवसायिक धोरण? ही सूचना सुचवणारे सुपीक डोके कोणाचे? ३०% प्रवास भाडेवाढीचा निर्णयाला प्रवाशांचा निषेध, नाराजी यामुळे एका दिवसात निर्णय मागे घ्यावा लागला. एस. टी.वर ही नामुष्की कोणामुळे आली? अशा निर्णयामुळे एस.टी. चा प्रमुख घटक प्रवासी एस. टी.पासून दुरावत आहे.वाहतूक विभाग. एस. टी. प्रवासी वाहतूक आणि खासगी प्रवासी वाहतूक यांच्या नियमांचे वाहतूक विभागकडून पाहिजे तशी अंमलबजावणी केली जात नाही. एस. टी.ची प्रवासी वाहतूक ही टप्प्याची वाहतूक आहे, त्यासाठी प्रवासी कर प्रणाली वेगळी असून जास्त प्रमाणात कर द्यावा लागतो. खासगी वाहतूकदारांनी थेट प्रवासी वाहतूक केली पाहिजे, पण तेही टप्प्याची वाहतूक करतात. एस. टी. आगार, एस.टी. बसस्थानक, एस.टी. थांबा यापासून २०० मिटरपेक्षा लांब खासगी गाड्या उभ्या करण्याची परवानगी असते, त्याचप्रमाणे खासगी गाड्यांची बुकिंग कार्यालयेसुद्धा २०० मीटर लांब असली पाहिजे, हे सर्व नियम सरसकट धाब्यावर बसविले जातात. एस. टी. मध्यवर्ती कार्यालय आणि मुंबईतील मध्यवर्ती मुंबई सेंट्रल आगार यांचा मुख्य दरवाजा शेजारी खासगी प्रवासी वाहतूकदारांची बुकिंग कार्यालय आहेत. याकडे वाहतूक परिवहन विभाग का दुर्लक्ष करतो? हे न उलगडणारे कोडे आहे. एस. टी. अधिकारी याबाबत आपले अध्यक्ष तथा परिवहन मंत्री यांच्याकडे तक्रार का करीत नाही? त्यांच्या निदर्शनास का आणून देत नाही, याचाही विचार करावा लागेल.राज्य शासनाचे परिवहन मंत्रीच एस. टी. महामंडळाचे अध्यक्ष असल्यामुळे राज्य शासनाचा प्रत्यक्ष हस्तक्षेप असतो. अध्यक्ष यांच्या निर्णयावर संचालक, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, एस. टी. वरिष्ठ अधिकारी आपले स्पष्ट मत मांडत नाही असे वाटते. एस. टी. कर्मचारी बदलीपासून ते धोरणत्मक निर्णयापर्यंत राज्य शासनाच्या परवानगीने किंवा सुचनेने घ्यावे लागतात . राज्य शासन परवानगीने व सुचनेने कित्येक चालक-वाहक यांच्या बदल्या केल्या जातात, त्यामुळे काही आगारात गाड्या उपलब्ध असतात पण चालक-वाहक यांची कमतरता असते, तर काही आगारात चालक-वाहक उपलब्ध असतात, तर गाड्यांची कमतरता असते. काही ठिकाणी तर प्रवाशांची उपलब्धता नसतानाही स्थानिक लोकप्रतिनिधींच्या आग्रहाखातर गाड्या चालवाव्या लागतात. एस. टी. गाडीला जास्त भारमान कसे आणि कोठे मिळेल हे एस. टी.चा चालक-वाहक, आगर व्यवस्थापक आणि प्रवासीच सांगू शकेल. त्यांच्या सूचनांचा आदर आणि विचार केला, तर एस. टी. चा तोटा नक्कीच कमी होईल, किंबहुना एस. टी. फायद्यात येईल.

# आत्महत्या रोखण्यासाठी जागरूकता गरजेची




देशात आत्महत्येचं प्रमाण दिवसागणिक वाढताना दिसत आहे. देशातच नाही तर जगभरात प्रत्येक वर्षाला जवळपास ८,५०,००० लोक आत्महत्या करतात, तर १५ मिलियन लोक आपलं आयुष्य संपवण्याचा प्रयत्न करतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या माहितीनुसार, १५ ते १९ वर्षे या वयोगटातील आत्महत्या हे मृत्यूचं प्रमुख कारण आहे. आत्महत्येमागे नैराश्य, असहाय्यता आणि जीवन व्यर्थ असल्याची भावना असते. यामागे वैद्यकीय कारणंही असतात. आत्महत्या अर्थात स्वतःचा जीव घेणे ही वृत्ती. तणाव, दु:ख, निराशा, अपयश, एकाकीपणा, अपमान आणि गरिबी, वृद्धत्व, गंभीर आजार आत्महत्येची प्रमुख कारणं म्हणता येतील. समस्या सोडवण्याचा कोणताही मार्ग नाही असे वाटणारे लोक आत्महत्या करतात. कार आत्महत्या हा वेदना संपवण्याचा एकमेव मार्ग आहे; परंतु तुम्ही सुरक्षित राहण्यासाठी पावले उचलू शकता आणि पुन्हा तुमचे जीवन आनंदाने जगू शकता.आत्महत्या हा मानसिक आजार आहे. दैनंदिन जीवनात आत्महत्या ही एक गंभीर समस्या आहे. एका रिसर्चमध्ये केलेल्या आकडेवारीवरून असे दिसून आले आहे की, १५ ते ३५ वर्षे वयोगटातील पुरुष आणि स्त्रिया जास्त आत्महत्या करतात. छोटी छोटी संकटे आली तरी हल्ली लोकांच्या मनात आत्महत्येचे विचार मनात घोंगावू लागतात. समस्या, दु:ख प्रत्येकाच्या वाट्याला असतात. त्यावर मात करायची तयारी ठेवली पाहिजे. आत्महत्या करून संकटे संपत नसतात. एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षांत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्याने केलेल्या आत्महत्येमुळे वाढत्या आत्महत्यांचा विषय ऐरणीवर आला आहे. त्यामुळे आता वाढत्या आत्महत्यांबद्दल जागरूकता निर्माण करणे ही काळाची गरज झाली आहे. कोणाचेही मन ओळखणे तशी अवघड गोष्ट असते. मनात काय विचार सुरू आहेत हे ओळखणे तसे कठीणच आहे. आपल्याकडे लोक काय म्हणतील, आपल्यातील दोष किंवा आपल्यातला कमकुवतपणा दुसऱ्यासमोर दाखवायचा नाही अशी संस्कृती आहे. मानसिक आजारांबद्दल अजूनही संकोच, लाज किंवा नकारात्मकता प्रत्येकामध्ये असते. कामाचा ताण, स्पर्धा, अपेक्षा आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे कोणाला काही सांगायचे नाही हाच मोठा धोका आहे. त्यामुळे दरवर्षी लाखो लोक मानसिक ताण, सामाजिक दबाव किंवा एकटेपणामुळे टोकाचे पाऊल उचलत आपला जीव गमावतात. बहुतेक लोकांना जगायचे असते, पण त्यांची परिस्थिती किती भयानक आहे आणि त्यांना पर्यायी उपाय दिसत नसल्याने ते अडकलेले वाटतात. काही लोकांसाठी, तर्क करण्याची आणि समस्या सोडवण्याची सकारात्मक उपाययोजना करण्याची त्यांची क्षमता प्रभावित होते, परिणामी आवेगपूर्ण निर्णय घेण्याची क्षमता निर्माण होते. दहावी, बारावी परीक्षेचीत अपयश आले तरी मुलांच्या मनात आत्महत्येचे विचार येऊ लागतात. ही चांगली गोष्ट नाही. दहावी, बारावी म्हणजे पूर्ण आयुष्य नसते. पुढे भरपूर आयुष्य असतं. हे समजावून सांगण्याची गरज असते. आज आपल्या राज्यात आत्महत्येचे प्रमाण चिंताजनक आहे. विशेषतः ते तरुणांमध्ये जास्त आहे. नैराश्य, चिंता, एकटेपणा हे दिसत नसले तरी ते आजारच आहेत. वारंवार उदास राहणे, सातत्याने निराशावादी बोलत राहणे, स्वतःला इजा करण्याबद्दल बोलणे, सामाजिक माघार घेणे, एकटे राहण्याची इच्छा व्यक्त करत राहणे. मानसिक आरोग्याच्या समस्या, नोकरी गमावणे, कर्ज, कौटुंबिक तणाव, आधाराचा अभाव, सामाजिक संपर्काचा अभाव असतो. यामुळे आत्महत्यांचे विचार मनात येत असतात. एकमेकांशी बोलण्यापेक्षा किंवा गोष्टी शेअर करण्यापेक्षा आयुष्य संपवण्याचे धाडसी पाऊल उचलले जाते. ही समाजासाठी धोक्याची घंटा आहे.

मुळात कोणतीही समस्या ही कायमस्वरूपी नसते हे लक्षात घेतले पाहिजे. कारण अंधारानंतर प्रकाश हा असतोच. त्यामुळे एक नवी पहाट येतेच. त्यामुळे कुठल्याही समस्येवर आत्महत्या हा तोडगा नाही. कोणतीही समस्या सोडविण्याकरिता प्रयत्न करत राहणे गरजेचे असते. त्या प्रयत्नांना यश मिळेलच असा सकारात्मक विचार करणे गरजेचे असते. या सकारात्मतेमुळेच वेगळी ऊर्जा मिळते. त्यानंतर एक वेगळाच उत्साह येत असतो. आजच्या डिजिटल युगात संवाद कमी झाला आहे. पण, 'संवाद' हा आत्महत्या रोखण्यासाठीचे उत्तम औषध आहे. आपल्या अडचणी, समस्या एकमेकांना सांगितल्या तर त्या सोडवण्यासाठी मदत होते. त्यामुळे जवळचे मित्र, जवळची व्यक्ती यांच्याशी संवाद ठेवणे महत्त्वाचे असते. यामुळे मनावरील ताणही हलका होतो. तसेच ताण असेल तर समुपदेशक, मानसोपचार तज्ज्ञ यांचा सल्लाही घेणे महत्त्वाचे ठरते. तुम्ही एकटे नाही, कोणतीही समस्या ही कायमस्वरूपी नसते. त्यांच्यासाठी सुरक्षित वातावरण तयार करणे, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास जागृत करणे गरजेचे असते. त्यामुळे त्यांची सामाजिक, शैक्षणिक प्रगती सुधारण्यास मदत होते, असे आशेचे संदेश देणेही त्यांच्यामध्ये बळ निर्माण करू शकतात. त्यामुळे असे आशेचे संदेश देणे गरजेचे आहे. आजच्या स्पर्धेच्या काळात शाळेतल्या विद्यार्थ्यांपासून ते तरुण आणि ज्येष्ठांपर्यंत तणावाचे प्रमाण अधिक आहे. हा तणाव दूर करण्यासाठी योग्य पद्धतीने समुपदेशन होणे गरजेचे आहे. तणावाविरुद्ध लढाई जिंकणे महत्त्वाचे आहे. आत्महत्येचे विचार टाळण्यासाठी सर्वांनी मिळून काम करणे गरजेचे आहे. कोणाला मदतीची गरज असेल तर त्यासाठी तत्परता दाखविली तर आपल्यासोबत कोणीतरी आहे, अशी आत्मीयता त्यांच्यामध्ये निर्माण होते. त्याच्यातून त्यांना ताण कमी होण्यास मदत होते. शारीरिक आरोग्याइतकीच मानसिक आरोग्याची काळजी घेणे ही आता काळाची गरज बनली आहे. त्यामुळे आत्महत्येसारख्या गंभीर विषयाबाबत जागरूकता निर्माण करणे हे आपल्या सर्वांचेच कर्तव्य आहे.

समस्येबद्दल, जागरूकता वाढवण्याबद्दल नाही तर ती आत्महत्या समस्येला कारणीभूत ठरणाऱ्या समस्यांबद्दल जागरूकता वाढवण्याबद्दल आहे. राष्ट्रीय आत्महत्यांचा डेटा नोंदवल्या गेलेल्या शेवटच्या काळात ३,००० हून अधिक लोकांनी आत्महत्या केल्या हे जाणून घेणे एक गोष्ट आहे. चिंता आणि ताणतणावांना दाबून ठेवणे (कारण कोणीतरी असे मानते की जर ते याबद्दल बोलले तर त्यांना दोषी ठरवले जाईल किंवा कमकुवत पाहिले जाईल) आत्महत्येच्या दरात वाढ होण्यास हातभार लावते हे जाणून घेणे दुसरी गोष्ट आहे. त्यामुळे आत्महत्येचे प्रमाण कमी करण्यासाठी मानसिकता बदलणे आवश्यक आहे. ऑस्ट्रेलियाच्या चिंताजनक आत्महत्येच्या आकडेवारीबद्दल जागरूकता वाढवणे ही एक चांगली सुरुवात आहे. बदल प्रभावी होण्यासाठी, आपल्यापैकी अधिकाधिक लोकांना आत्महत्येच्या दरामागील कारणे समजून घेणे आवश्यक आहे.

# हनी ट्रॅपपासून वेळीच सावध व्हा!



आजकाल आपण हनी ट्रॅपबद्दलच्या बातम्या, घटना त्यातून वाढत चाललेली गुन्हेगारी वृत्ती, बदनामीच्या भीतीने घडणाऱ्या आत्महत्या याबद्दल रोज ऐकतो, वाचतो. या लेखात आपण हनी ट्रॅपबद्दल सविस्तर माहिती घेणार आहोत. हनी ट्रॅप म्हणजे एखाद्या आकर्षक किंवा मोहक व्यक्तीचा वापर करून दुसऱ्या व्यक्तीला जाळ्यात अडकवणं, शक्यतो अडकवणारी व्यक्ती ही महिला असते. हा ज्याला अडकवायचं त्याच्यासाठी एक प्रकारचा मानसिक आणि भावनिक सापळा आहे. यात खोटं प्रेम, आकर्षण, जवळीक, आपुलकी किंवा शारीरिक संबंधांचे आमिष दाखवून समोरच्या व्यक्तीकडून पैसे, मालमत्ता, गोपनीय माहिती किंवा इतर वैयक्तिक फायद्याच्या गोष्टी मिळवल्या जातात.

पूर्वी गुप्तहेर संस्थांकडून गुप्त माहिती मिळवण्यासाठी याचा वापर केला जायचा. सोशल मीडियाच्या युगात याचे स्वरूप बदलले आहे आणि आता सर्वसामान्य व्यक्तीही यात अडकू शकतात. हनी ट्रॅप वेगवेगळ्या कारणांसाठी केला जातो, त्यापैकी काही प्रमुख कारणे म्हणजे ब्लॅकमेलिंग, समोरच्या व्यक्तीला त्यांच्या खासगी क्षणांचे, फोटो किंवा व्हिडीओ मिळवून अथवा तो सोबत असताना शारीरिक संबंध करतानाचे फोटो, व्हिडीओ काढून त्यालाच नंतर ब्लॅकमेल करणे, त्याला व्हिडीओ कॉलमार्फत नको त्या गोष्टी करायला सांगून त्याचे रेकॉर्डिंग करून घेणे आणि नंतर त्याला त्रास देणे असे विविध प्रकार हनी ट्रॅप करणारी व्यक्ती वापरत असते. आर्थिक फायदा हा यातील महत्त्वाचा भाग आहे. मोठ्या पदावर असलेल्या व्यक्तींकडून पैसे, मालमत्ता किंवा इतर आर्थिक फायदे मिळवण्यासाठी हनी ट्रॅपचा वापर केला जातो. एकदा समोरचा ब्लॅकमेलिंग, सामाजिक बदनामी, नोकरी व्यवसायाच्या ठिकाणी हे समजलं तर नोकरी जाईल, व्यवसायावर परिणाम होईल, समाजात बाहेर कुठे हे फोटो व्हिडीओ व्हायरल झाले तर काय होईल याला घाबरून जातो. अशा तणावात्मक परिस्थितीत असलेल्या व्यक्तीला वारंवार धाक दाखवून मोठ्या रकमेची मागणी केली जाते. एखाद्या व्यक्तीकडून गुप्त माहिती मिळवण्यासाठी जसे की सरकारी अधिकारी, शास्त्रज्ञ किंवा उच्च पदावरील व्यक्तींकडून देशाच्या सुरक्षेशी संबंधित किंवा इतर गोपनीय माहिती मिळवणे, कार्यालयीन माहिती, राजकीय डावपेच, मोठे व्यवहार, महत्त्वाचे निर्णय याबद्दल माहिती काढणे हनी ट्रॅपद्वारे सहज शक्य होते.

राजकीय हेतू हनी ट्रॅपमध्ये अनेकदा पाहायला मिळतो. राजकीय विरोधकांना बदनाम करणे किंवा त्यांच्याकडून चुकीचे निर्णय घ्यायला लावून राजकीय फायदा मिळवणे, महत्त्वाचा राजकीय निर्णय अथवा घडामोडीमध्ये हस्तक्षेप करण्यासाठी, राजकीय भूमिका बदलण्यासाठी, नेते अथवा पक्ष फोडीसाठी सुद्धा हनी ट्रॅप वापरला जातो. राजकीय पद मिळवणे, राजकारणात पुढे जाणे, उच्चपदस्त नेते मंडळीशी जवळीक साधणे, त्यांच्याकडून कामे करून घेणे यासाठी हनी ट्रॅपचा वापर केला जातो. आपल्या कामाचे क्षेत्र कोणतेही असो आपण हनी ट्रॅपमध्ये अडकणार नाही. यासाठी प्रत्येकाने सतर्क राहणे आवश्यक आहे. अगदी तरुण मुलं-मुली, वयोवृद्ध सुद्धा अशा सापळ्यात अडकत असतात. त्यामुळे आपलं वय कितीही असले तरी सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. हनी ट्रॅपमध्ये पुरुष कसे अडकतात यावर अभ्यास केला असता काही मुद्दे प्रकर्षाने लक्षात येतात. मुख्य म्हणजे आजकाल प्रत्येकजण समाज माध्यमातून, मोबाईल, लॅपटॉपवरून विविध ॲप्लिकेशन, साईट्स हे नियमित वापरत असतात, अनेक नोटिफिकेशन आपल्याला येत असतात, अनेकदा विविध मेसेज, लिंक्स तपासून न घेता त्या उघडून पाहण्याची इच्छा होईल अशा प्रकारे तयार केलेल्या असतात. अशाच वेगवेगळ्या क्लृप्त्या वापरून सोशल मीडियावर पुरुषांशी ओळख करून ती वाढवली जाते. फेसबुक, इन्स्टाग्राम, डेटिंग एप्स किंवा इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर आकर्षक प्रोफाइलच्या माध्यमातून ओळख केली जाते. जवळीक झाल्यावर, समोरील व्यक्तीने आपला विश्वास संपादन केला आहे. हे लक्षात आल्यावर या सोशल मीडियावरील एकमेकांशी केलेल्या चॅटिंगचा, शेअर केलेले फोटो, व्हिडीओ आणि माहितीचा वापर करून समोरील व्यक्तीवर दबाव आणला जातो. जेव्हा कोणत्याही पुरुषाने भावनेच्या भरात काही आक्षेप हाय चॅटिंग केलेले असेल, मागणी केली असेल त्याला सावज बनवले जाते.

भावनिक नातं तयार करून ही व्यक्ती हळूहळू तुमच्याशी गोड बोलून जवळचं नातं निर्माण करते आणि तुमचा विश्वास जिंकते. त्यानंतर खासगी माहितीची देवाणघेवाण सुरू होते. जसे की समोरील व्यक्ती तुमच्याकडून तुमच्या खासगी आयुष्याबद्दलची माहिती घेते. तुमचे वीकपॉइंट, सुखं, दुःखं, सवयी ओळखून तुमच्याशी अधिक जवळीक साधण्याचा प्रयत्न करते. अगदी आपल्या कुटुंबाबद्दल, घर, नोकरी, उद्योग दैनंदिन रुटीन याबद्दल पण माहिती काढून घेतली जाते. अत्यंत संवेदनशील मुद्दा हनी ट्रॅपमध्ये अडकण्यासाठी कारणीभूत ठरतो. अनेकदा एखादी व्यक्ती व्हिडीओ कॉलवर अश्लील संभाषण किंवा कृती करण्याची मागणी करते. या क्षणांचे रेकॉर्डिंग करून ठेवले जाते त्यानंतर ब्लॅकमेलिंग सुरू होते. तुमच्याकडून पैशाची मागणी केली जाते किंवा काही गोपनीय महत्त्वाची माहिती द्यायला सांगितले जाते अथवा कोणतेही कामं जे जोखमीचे असेल ते तुमच्याकडून जबरदस्तीने करून घेतले जाते. हनी ट्रॅपपासून वाचण्यासाठी काय करावे हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. या सापळ्यात अडकण्यापासून स्वतःचा बचाव करण्यासाठी तुम्ही काही गोष्टी करू शकता. सामाजिक माध्यम वापरताना अनोळखी व्यक्तींशी सावधगिरी बाळगा. सोशल मीडियावर अनोळखी व्यक्तींच्या फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारताना सतर्क राहा, कोणतीही खोटी प्रोफाइल, खोटी माहिती खोटा फोटो टाकून बनवली आहे की खरंच अशी व्यक्ती अस्तित्वात आहे, कुठे आहे, काय करते याचा शहानिशा करा. कुठल्याही अस्तित्वात नसलेल्या, संबंध नसलेल्या सुंदर मुलींचे, महिलांचे इंटरनेटवरून फोटो वापरून, त्याला खोटं नावं वापरून विविध ॲप्लिकेशनवर टाकलेले असतात. त्या प्रोफाइलला हाताळणारे भलतेच लोकं असतात जे तुम्हाला हनी ट्रॅप करण्यासाठी अनेक प्रकारे प्रयत्न करत असतात. त्यामुळे कितीही मोह झाला, आकर्षण वाटले तरी आपली सदसदविवेकबुद्धी जागृत ठेऊनच सोशल मीडिया हाताळणे उचित आहे. कोणालाही आपली वैयक्तिक माहिती देऊ नका, कोणत्याही अनोळखी व्यक्तीसोबत तुमच्या खासगी आयुष्याबद्दल, आर्थिक परिस्थितीबद्दलची माहिती शेअर करू नका. अनोळखी व्यक्तींसोबत व्हिडीओ कॉलवर खासगी किंवा अश्लील संभाषण टाळा. अशा परिस्थितीत कोणतीही आक्षेपार्ह गोष्ट करू नका, पैशाची मागणी करणाऱ्यांपासून दूर राहा. जर कोणी तुमच्याकडे अचानक पैसे किंवा इतर मदतीची मागणी करत असेल, त्याचा हेतू योग्य वाटतं नसेल, तर लगेच सावध व्हा. अशा प्रकरणात पोलिसांची मदत घेणे अत्यंत आवश्यक आहे. जर तुम्हाला कोणी ब्लॅकमेल करत असेल तर घाबरू नका. लगेच पोलिसांना याची माहिती द्या, कायद्याची मदत घ्या. जर तुम्हाला हनी ट्रॅपच्या कोणत्याही परिस्थितीत अडकल्याचा संशय आल्यास, कारवाई करण्यासाठी कुटुंबातील सदस्य, मित्र, नातेवाईक यांची मदत घ्या, त्यांना विश्वासात घ्या, स्वतःची चूक मान्य करा, घाबरून, गडबडीत चुकीचा निर्णय घेणे टाळा. अशावेळी तुम्ही पोलिसांना किंवा सायबर सेलला संपर्क करू शकता.

# माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांच्या वाढदिवसा निमित्त आयोजित रक्तदान शिबिरात तब्बल ६२ दात्यांचे रक्तदान

## रक्तदात्यांचा हिरिरीने सहभाग; अनेकांनी स्वयंस्फूर्त केलं रक्तदान

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

परळी शहरातील कर्तृत्ववान उमदे युवा नेतृत्व व परळीच्या सर्वांगीण विकासाचा मुख्यदुवा म्हणून यशस्वी कारकीर्द निर्माण केलेले माजी नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे लोकप्रिय शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांच्या वाढदिवसा निमित्त आज (दि.११) रोजी आयोजित रक्तदान शिबिराला दरवर्षी प्रमाणेच उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात तब्बल ६२ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

राज्याचे माजीमंत्री आ.धनंजय मुंडे यांच्या प्रेरणेने बाजीराव भैय्या धर्माधिकारी मित्रमंडळाच्या वतीने माजी नगराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी यांच्या वाढदिवसा निमित्त आज दिनांक ११ ऑगस्ट रोजी स्व. श्री. मणिक बाजीराव धर्माधिकारी सभागृह, आंबेवेस, परळी वैजनाथ येथे रक्तदान



शिबीर आयोजित करण्यात आले होते. सकाळी या शिबिराचा शुभारंभ डॉ. जे. जे. देशपांडे, डॉ. सुरेशचंद्र चौधरी,शरदराव कुलकर्णी, वैजनाथराव सोळंके, आयुबभाई पठाण, अमर देशमुख, डॉ. विनोदजी जगतकर, अनंत इंगळे, श्रीकांत मांडे,राजेंद्र सोनी, रमेश चौंडे,अनिल अष्टेकर, के.डी. उपाडे महेंद्र रोडे, दत्ताभाऊ सावंत,संजय देवकर महावीर महालिंगे, अजय जोशी प्रा.शामसुंदर दासूद सर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला.हे रक्तदान शिबिर परळीत गावभागाची एक सामाजिक दायित्वाची परंपरा बनली आहे. दरवर्षी वाढदिवसा निमित्त रक्तदान शिबीर आयोजित करण्यात येते. गेल्या १२ वर्षांपासुन सातत्याने घेण्यात येणारे व मोठ्या सहभागाचे शिबीर म्हणून हा सामाजिक उपक्रम परळीत अग्रेसर ठरलेला आहे.दर वर्षी नवनविन रक्तदात्यांना प्रोत्साहित करून रक्तदानाचे कार्य रूजविणे बाबत जागृती करणारा परळीतील हा उपक्रम आहे. यावर्षीही या शिबिरात रक्तदात्यांची उत्स्फूर्तता मिळाली. स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय अंबाजोगाई येथील पथकाने या शिबिरात रक्तदान प्रक्रिया पार पाडली.या शिबिरात तब्बल ६२ रक्तदात्यांनी रक्तदान केले.या शिबिराच्या यशस्वीतेसाठी बाजीराव भैय्या धर्माधिकारी मित्र मंडळाने परिश्रम घेतले.

# भक्तीभावनेने भगवंताला शरण गेल्यावर भगवंत संकटाचे निरसण करतो–भागवताचार्य सिद्धेश्वर महाराज

**परळी । प्रतिनीधी**

श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळया अंतर्गत श्रीमद् भागवत कथेच्या दुसर्या दिवसाची कथा सांगतांना मानवांच्या जीवनातील दु:खाचे समुळ निरसण करण्यासाठी मानवाने भगवंताला अनंन्य भक्तीभावाने शरण गेल्यास भगवंत भक्तांच्या सर्व संकटाचे निरसण करतो असे प्रतिपादन भागवताचार्य श्री ह.भ.प. सिध्देश्वर महाराज शास्त्री यांनी कथेचे दुसरे पूष्प गूंफतांना सांगीतले. भागवत कथेच्या दुसर्या दिवसाची महाआरती राष्ट्रवादी कॉग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके, माजी ऊपनगराध्यक्ष रविंद्र परदेशी, माजी नगरसेवक जालींदर नाईकवाडे, वारकरी मंडळाचे प्रदेशाध्यक्ष श्री ह.भ.प.रामेश्वर कोकाटे महारांज यांच्याहस्ते भागवत कथेची आरती करण्यात आली.



श्री नर्मदेश्वर गुरुकुल येथे श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळयाचे मोठया ऊत्साहात आयोजन करण्यात आले आहे. यातील भागवत कथेत कथाप्रवक्ते श्री हभप सिद्धेश्वर महाराज शास्त्री यांनी दुसर्या दिवसाची कथा सांगतांना महाराज यांनी सांगीतले की पाच पांडव भगवंताला अनन्यभावे शरण गेल्यामुळे कौरव शंभर असुनहि पाच पांडवांच्या केसालाहि धक्का लावू शकले नाहित. भागवतभक्त परिक्षितीची माता ऊत्तरा भगवंताला शरण गेल्यामुळे भगवंताने गर्भातच परिक्षीतीचे रक्षण केले. मनवानेहि सदैव भगवंताला अनन्यभावे शरण गेल्यास मानवावरील प्रत्येक संकटाचे भगवंत निरसण करतो असे प्रतिपादन केले. कथेच्या प्रारंभी ग्रंथाची पुजा श्रीकृष्ण मीत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार डाके व सौ.शारदा डाके यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी आरतीसाठी ऊपस्थीत श्री वैजनाथराव सोळंके, रविंद्र परदेशी, जालींदर नाईकवाडे, श्री ह.भ.प. रामेश्वर कोकाटे महाराज आदी मांन्यवरांचा सत्कार श्री नरमदेश्वर गुरुकुलचे संस्थापक अध्यक्ष श्री ह.भ.प.अर्जुम महाराज शिंदे शास्त्रीजी यांनी शाल व श्रीफळ देऊन केले. यावेळी या परिसरातील असंख्य भावीकभक्त यावेळी मोठया संखेने ऊपस्थीत होते.

# अपघातातील जखमी जनावरांचे डॉ.तेजस दुनघव यांनी प्राण वाचविले!

## सर्व स्तरातून डॉ दुनघव यांचे होत आहे कौतुक

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील बसस्थानका समोर शनिवार रोजी रात्री १२:१५ वाजण्याच्या सुमारास जालना रोडवर एका अज्ञात वाहनाने मोकाट जनावरांसह दोन म्हशींच्या पिल्लांना धडक दिली. यात मोकाट जानावरांसह म्हशींची दोन्ही पिल्ले गंभीर जखमी झाल्याची माहिती डॉ. तेजस दुनघव यांना मिळताच दुनघव यांनी तत्काळ जखमी जनावरांवर उपचार केल्यामुळे जीवदान मिळाले. डॉ दुनघव यांनी कामामुळे त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

या बाबत अधिक माहिती अशी की

बीड शहरातील बस स्थानकासमोर नेहमीच मोकाट जनावरांचा वावर असतो. काही प्रसंगी हे जनावरे रस्त्यावर ठाण मांडून



बसलेले असतात. त्यांच्यामुळे अनेक वेळा अपघात झालेले आहेत.

शनिवार रोजी रात्री १२:१५ वाजण्याच्या सुमारास जालना रोडवर एका चारचाकी वाहन मोकाट जनावरांसह दोन म्हशींच्या पिल्लांना जोरात धडक देऊन ही चारचाकी दुभाजकावर गेली. या अपघातात दोन म्हशीचे पिल्ले गंभीर जखमी अवस्थे मध्ये पडले होते. या घटनेची माहिती मिळताच जनावराचे डॉक्टर तेजस दुनघव यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. गंभीर जखमी झालेल्या जनावरांवर उपचार करायला सुरुवात केली. अगदी वेळेत उपचार सुरू झाल्यामुळे गंभीर जखमी जनावरांना वाचवण्यात डॉक्टर दुनघव यांना यश आले. मोकाट गंभीर जखमी झालेल्या या जनावरांवर उपचार करून त्यांना जीवदान देणाऱ्या डॉ. दुनघव यांनी केलेल्या या कामामुळे जनावराचे प्राण वाचले आहेत. त्यामुळे त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## रोजंदारी मजदुर सेनेच्या दणक्याने मुख्याधिकारी यांनी दिले लेखी पत्र

# न्याय हक्कासाठी स्वातंत्र्य दिनी पिडित कंत्राटी कामगार तुर्तास सामुहिक आत्मदहन स्थगित करुन अन्नत्याग आंदोलन करणार

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगर परीषद कार्यालय समोर घनकचरा व्यवस्थापनातील अन्यायग्रस्त पिडित कंत्राटी कामगारांच्या वतीने न्याय प्राप्त करुन घेण्यासाठी मंगळवारी धरणे निदर्शने करण्यात आले.सदरील आंदोलन रोजंदारी मजदूर सेनेचे केंद्रीय महासचिव गौतम आगळे यांचे प्रमुख मार्गदर्शनात तर संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष भाई राजेशकुमार जोगदंड यांच्या सह – नेतृत्वात संपन्न झाले. दरम्यान नवनियुक्त मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी रोजंदारी मजदुर सेनेचे मराठवाडा अध्यक्ष राजेशकुमार जोगदंड यांच्याशी सकारात्मक चर्चा केली. शासनाकडे निधी प्रस्ताव




पाठवुन अन्यायग्रस्त कामगारांना निविदा प्रक्रिया अंमल बजावणी करुन कामावर घेण्यात येईल असे मुख्याधिकारी यांनी लेखी पत्राद्वारे कळविले आहे . १५ऑगस्ट २०२५ पुर्वी घन कचरा व्यवस्थापन निधी करीता शासनाकडे प्रस्ताव पाठवल्याची प्रत नगर परीषद बीड यांनी संघटनेस द्यावी अशी मागणी मुख्याधिकारी यांच्या पत्रात उलट टपाली करण्यात आली.बीड नगर परीषदेचे मुख्याधिकारी यांचे प्रतिनिधी रितेश वडमारे यांनी संघटनेचे भाई राजेशकुमार जोगदंड यांच्या प्रमुख उपस्थितीत लेखी पत्र दिल्याने आंदोलन स्थगित करण्यात आले.आंदोलनात महिला जिल्हा अध्यक्षा अनिता बचुटे , जिल्हा उपाध्यक्षा सुनिता जोगदंड,कामगार प्रतिनिधी रेश्मा बोराडे सह आशाबाई कांबळे, आश्विनी वाघमारे व ईतर पिडित कंत्राटी कामगार उपस्थित होते.शेवटी रोजंदारी मजदुर सेनेच्या वतीने बीड शहरातील स्वच्छ्ता कामगारांची कमतरता असल्याने स्वच्छते अभावी अबाल वृद्ध नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे ही बाब मुख्याधिकारी यांच्या प्रकर्षाने निर्दर्शनास आणुन देण्यात आली.

# विश्व हिंदू परिषद स्थापना दिन व जीवन गौरव पुरस्कार वितरण समारंभ

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

विश्व हिंदु परिषद, अंबाजोगाई प्रखंड व बजरंग दल अंबाजोगाई च्यावतीने धर्मवीर विश्व हिंदू परिषद स्थापना दिन व जीवनगौरव पुरस्कार वितरण समारंभ रविवार दि.१७ ऑगस्ट रोजी दुपारी चार वाजता गोपीनाथराव मुंडे सभागृह,खोलेश्वर महाविद्यालय येथे आयोजित करण्यात आली असून आपल्या प्राणांची पर्वा न करता केलेल्या अतुलनीय हिंदूधर्म रक्षण व कार्याबद्दल प्रफुल्ल (नाना) कुलकर्णी यांना धर्मवीर जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात येणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ. शरदराव हेबाळकर (पूर्व अध्यक्ष,अखिल भारतीय इतिहास संकलन समिती,रा.स्व. संघ) हे राहणार आहेत. तर प्रमुख पाहुणे आ.नमिता मुंदडा, कृष्णाजी देशमुख (विहिंप.प्रान्त कार्य. सदस्य,बजरंगदल प्रान्त पालक)चंद्रकांत घोलप (संयोजक बजरंग दल प्रांत)अड.बाळकृष्ण तेरकर(जिल्हा मंत्री विहिंप)डॉ.मुकुंद कुलकर्णी (प्रांत सेवा प्रमुख,विहिंप)




डॉ.गोपाळ चौसाळकर (जिल्हा उपाध्यक्ष विहिंप),साईनाथ उपरे (अध्यक्ष,निलेश डहाळे मंत्री)आदी उपस्थित राहणार आहेत.या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन
अशिष शिंदे,अक्षय सातपुते,संयोजक सुदर्शन महाराज साखरे संघटक मिलिंद जोगी विश्व हिंदु परिषद व बजरंग दल प्रखंड, अंबाजोगाई यांनी केले आहे.

## इतिहास महाराष्ट्राचा स्पर्धेची बीडमध्ये उत्साही सुरुवात

# बालकलावंतांच्या कलागुणांनी रसिक मंत्रमुग्ध ३०० हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग



**बीड । प्रतिनिधी**

येथील नवगण शिक्षण संस्था संचलित सौ. के. एस. के. महाविद्यालयात बालरंगभूमी परिषदेच्या वतीने आयोजित 'इतिहास महाराष्ट्राचा' या स्पर्धेची प्राथमिक फेरी मंगळवारी (दि.१२) उत्साहात पार पडली. कार्यक्रमाचे उद्घाटन बीडचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या हस्ते झाले. प्रमुख अतिथी म्हणून नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश क्षीरसागर उपस्थित होते. उद्घाटक आणि प्रमुख अतिथींनी सर्व बालकलावंतांना शुभेच्छा देत त्यांना प्रोत्साहन दिले.

नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला, शिल्पकला, वक्तृत्व, पोवाडे यांसारख्या विविध कलाप्रकारांची आकर्षक सादरीकरणे बालकलावंतांनी सादर केली. बीड, गेवराई, माजलगाव, उमरी आणि आसपासच्या गावांतील शालेय विद्यार्थ्यांसह काही सांस्कृतिक संस्थांनी सहभाग घेतला. या प्राथमिक फेरीत 'श्री शिवजन्मोत्सव ते श्री शिवराज्याभिषेक सोहळा' या विषयावर बालकलाकारांनी नाटक, पोवाडे, गाणी अशा विविध माध्यमांतून प्रभावी सादरीकरण केले. यावेळी बालरंगभूमी परिषदेच्या उपाध्यक्षा डॉ. दीपा क्षीरसागर, सहकार्यवाहक स्नेहलता पाठक, प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, प्रमुख कार्यवाहक संजय पाटील देवळांकर, कोषाध्यक्ष डॉ. व्ही. टी. देशमाने, सहकार्यवाहक शाहीर विलास सोनवणे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. महाराष्ट्रभर आयोजित या स्पर्धेला उदंड प्रतिसाद मिळत असून बीड जिल्ह्यातील प्राथमिक फेरीत तब्बल ३०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मिलिंद शिवनीकर, अमित गाडे, सिद्धार्थ अग्रवाल, अनिता शिंदे, दुष्यंत रामटेके, विजय राख, दीपक जमदाडे, राहुल सोनवणे, सुरेश थोरात, सुरेश साळुंखे, नामदेव साळुंखे, किरण राठोड, इंद्रजीत भांगे, असलम शेख आदींनी परिश्रम घेतले.

# माजी आमदार कै.बाबुरावजी आडसकरांनी सहकार व शिक्षण क्षेत्राच्या माध्यमातून सशक्त पिढी घडविली–ह.भ.प.महंत भगवान महाराज शास्त्री

**केज । प्रतिनिधी**

लोकनेते माजी आमदार कै.बाबुरावजी आडसकर साहेबांनी राजकारणात माणसं जोडण्याला महत्व दिले होते.सर्व सामान्यमाणूस त्यांच्या बंगल्यावर जावुन आपली समस्या सांगत होता.प्रत्यक्षात वा फोन करून साहेब तो प्रश्न सोडवत असत.

शैक्षणिक संस्थाचे जाळे निर्माण करुन त्यांनी शैक्षणिकपिढी घडविली असे प्रतिपादन ह.भ.प. महंत भगवान महाराज शास्त्री वरपगांवकर यांनी केले.ते आडस येथे झालेल्या कै.बाबुरावजी आडसकर यांच्या पुण्यतिथी निमित्त किर्तन सादर करतांना बोलत होते.या किर्तना पुर्वी रोगनिदान शिबीर व रक्तदान शिबीर घेण्यात आले.त्यामध्ये ५१ व्यक्तींनी रक्तदान केले.रोगनिदान शिबीरा चे क्षय रोग,शुगर, रक्तदाब,नेत्र रोग या विषयी निदान करुन मार्गदर्शन करण्यात आले.स्वामी रामानंद तिर्थ वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाईच्या पथकाने या मध्ये महत्वपूर्ण जबाबदारी पार पाडली.

या पुण्यतिथी निमित्त केज,अंबाजोगाई परिसरातील राजकीय, सामाजिक,पत्रकार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. या मध्ये प्रामुख्याने राजकिशोर पापा मोदी, रामभाऊ कुलकर्णी, केज न.पं.च्या नगराध्यक्षा सीताताई बनसोड,हारुण इनामदार,दत्ता पाटील, राजेश्वर चव्हाण,बबन भैया लोमटे,हनुमंतमोरे, उदयसिंह दिखवत, कमलाकर कोपले, उद्धव बापु आपेगावकर उपस्थित होते.या प्रसंगी अंबासाखरचे चेअरमन रमेशराव आडसकर यांनी आलेल्याअतिथींचे आभार मानले.सुत्र संचालन वसंत सहकारी पतसंस्थेचे चेअरमन सुरेश शिनगारे यांनी केले.या कार्यक्रमाचे शिस्तबद्ध नियोजन ऋषिकेश भैया आडसकर व रंजीत दादा आडसकर यांनी केले.



# धनेगाव येथे २५ वर्षांनी एकवटले बालमित्र,गेट टुगेदर कार्यक्रमात रमले

**केज । प्रतिनिधी**

बालपणीच्याआठवणीत मैत्रीभाव जोपासण्या साठी तब्बल २५ वर्षांनी सर्व मित्रांनी एकत्र येत गेट-टुगेदर कार्यक्रमाचे आयोजन केले होते.या कार्यक्रमाला बाल मित्रानी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.केजतालुक्यातील धनेगाव येथे १९९९ -२००० सातवी बॅचच्या मित्रांनी एकत्र येऊन बालपणी च्या आठवणीना उजाळा देण्यासाठी जिल्हा परिषदेच्या शाळेत इयत्ता पहिली ते सातवी पर्यंत शिक्षण घेतलेल्या इयत्ता सातवी च्या बाल मित्रांनी मेळावा घेत पुन्हाएकदा बालपणीचा आठवणी ताज्या केल्या.शाळेची घंटा वाजवून राष्ट्रगीत, प्रार्थना,परिपाठ घेऊन विद्यार्थ्यांनी पुन्हाएकदा बालपणीची शाळा अनुभवली.२५ वर्षापूर्वी ज्ञानदान केलेल्या



शिक्षकांवर पुष्पवृष्टी करत त्यांचा सन्मान करत ऋण व्यक्त केले. कार्यक्रमानंतर स्नेह भोजन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.यावेळी सण १९९९ - २००० साली कार्यरत असलेले शिक्षक सर्वश्री सोमवंशी, आरेकर, हांडीबाग, निपानिकर, श्री.शिखारे त्याचबरोबर भोसले दत्तात्रय वैजनाथ,नवनाथ जगताप, शिवप्रसाद स्वामी.सुरेखा मुळे, शुभांगी गुजर,स्वाती गुजर,सुनिता गुजर यांच्यासह इतरविद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

# नगरसेवकाचा भ्रष्टाचाराविरोधात यल्गार; प्रशासन मात्र थंडगार!

## बेमुदत आमरण उपोषणाला सुरुवात; केज शहरातील मागसवर्गीय नागरिकांमध्ये संतापाची लाट

**केज । प्रतिनिधी**

केज नगरपंचायतचे माजी नगरसेवक कपिल मस्के यांनी केज शहरातील गंभीर समस्या व प्रशासनातील भ्रष्टाचाराविरोधात उघडपणे हक्काची लढाई छेडली आहे. यासाठी त्यांनी १२ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजल्यापासून केज तहसिल कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण सुरू केले.

पहिल्याच दिवशी प्रशासनाने पाठ फिरवल्याने जनतेत नाराजी व्यक्त होत असून, लोकशाहीत शांततेच्या मार्गाने न्याय मिळवण्यासाठी लढणाऱ्याला देखील प्रशासन दाद देणार का नाही? असा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे.

**उपोषणामागची ठोस कारणे**

कपिल मस्के यांनी उपोषणात मांडलेल्या मागण्या केवळ वैयक्तिक नसून संपूर्ण शहराच्या हिताशी निगडित आहेत. त्यातील प्रमुख मागण्या अशा –

१. सर्वे नंबर ३०/१ मधील बेकायदेशीर खरेदी-विक्री तात्काळ रद्द करावी – या ठिकाणी आधीच कारवाई झालेली असून देखील खरेदी-विक्री सुरू आहे.

२. जनविकास इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेडवर गुन्हे दाखल करावेत – कंपनीने खोटे दस्तावेज तयार करून फसवणूक केली आहे.

३. सर्वे नंबर ३०/२ गायरान जमिनीवर शर्तभंगाची कारवाई करावी – अटी-शर्तींचा भंग झाल्याने तातडीने कायदेशीर पावले उचलावीत

४. शहरातील भ्रष्टाचार, बेकायदेशीर बांधकामे आणि अनियमित खरेदी-विक्रीवर त्वरित आळा घालावा.



**लोकांचा वाढता पाठिंबा**

या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर शहरातील विविध सामाजिक संघटना, व्यापारी वर्ग आणि सर्वसामान्य नागरिक कपिल मस्के यांच्या भूमिकेला पाठिंबा देत आहेत. हे केवळ एका व्यक्तीचे आंदोलन नसून शहराच्या भवितव्याचा प्रश्न आहे, असे मत नागरिक व्यक्त करत आहेत.

**प्रशासनाची शांत भूमिका संशयास्पद**

उपोषणाच्या पहिल्याच दिवशी संबंधित अधिकाऱ्यांनी कोणतीही दखल न घेणे, चर्चा न घडवून आणणे आणि मागण्यांवर प्रतिक्रिया न देणे, यामुळे प्रशासनाची भूमिका संशयास्पद ठरत आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**माझ्या मागण्या पूर्ण होईपर्यंत लढा सुरू राहील**

हे आंदोलन केवळ माझ्या वैयक्तिक हक्कासाठी नसून केज शहराच्या हक्कासाठी आहे. जोपर्यंत माझ्या मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत हे बेमुदत आमरण उपोषण सुरू राहील.

– कपिल मस्के, माजी नगरसेवक, न.प. केज

या आंदोलनातून केज शहरात भ्रष्टाचाराविरोधात नवा जनआंदोलनाचा अंकुर फुलत असून, प्रशासनाने वेळेत तोडगा काढला नाही, तर परिस्थिती चिघळून तीव्र संघर्ष उभारण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

# नंदुरबार जिल्हा महिला व बाल रुग्णालयात लॅप्रोस्कोपिक टी.एल. शस्त्रक्रिया शिबिराचे यशस्वी आयोजन



**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार येथील जिल्हा महिला व बाल रुग्णालयात ६ ऑगस्ट रोजी लॅप्रोस्कोपिक ट्यूबेक्टॉमी (ढड) शस्त्रक्रिया शिबिर यशस्वीरित्या पार पडले. या शिबिरात १३ महिलांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या, ज्यामुळे त्यांना कुटुंब नियोजनाची आधुनिक आणि सुरक्षित सुविधा उपलब्ध झाली. मा. सिव्हिल सर्जन डॉ. विनय सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि वैद्यकीय अधीक्षक डॉ. किसन पावरा यांच्या देखरेखीखाली हा उपक्रम राबवण्यात आला. लॅप्रोस्कोपिक सर्जन डॉ. शिरीष शिंदे यांनी या शस्त्रक्रिया केल्या, तर भूलतज्ज्ञ म्हणून डॉ. विनोद चव्हाण आणि डॉ. मगन पावरा यांनी सहकार्य केले.डॉ. कमलाकर चोरे, डॉ. नितीन पाडवी, डॉ. पुनम बडगुजर, डॉ. मंगला तुंगार आणि डॉ. श्यामकांत पाथरवट यांसारख्या डॉक्टरांनीही या शिबिरात महत्त्वाची भूमिका बजावली. या शिबिरामुळे जिल्ह्यातील महिलांच्या आरोग्य संरक्षणासोबतच कुटुंब नियोजनाबाबत जनजागृती होण्यास मदत झाली.



# केज उपजिल्हा रुग्णालयात जागतिक स्तनपान सप्ताह साजरा

**केज । प्रतिनिधी**

केज येथील उपजिल्हा रुग्णालयात जागतिक स्तनपान सप्ताह साजरा करण्यात आला. जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. स्तनदा मातांना यावेळी मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ केंद्रे यांनी स्तनपान या विषयावर मार्गदर्शन केले. आहार तज्ञ सुलक्षणा पाटील यांनी आई व बाळासाठी स्तनपानाचे महत्त्व सांगितले. स्तनदा मातेच्या आहाराविषयी मार्गदर्शन केले. यावेळी प्रमुख उपस्थिती स्त्री रोग तज्ञ इंगोले ,समुपदेशक सीता गिरी यांनी स्तनपानाच्या वेगवेगळ्या पद्धती विषयी स्तनपानाविषयी मार्गदर्शन केले. यावेळी अधिपरिचारिका

उपस्थिती होती. चित्रफित,चार्टच्या माध्यमातून मातांना मार्गदर्शन करण्यात आले.कार्यक्रमास स्तनदा मातांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# तळोदा येथे तालुकास्तरीय रानभाजी महोत्सव उत्साहात संपन्न

**नंदुरबार । दिपक गोसावी**

दि. १२ ऑगस्ट तालुका कृषी अधिकारी कार्यालय, तळोदा यांच्या वतीने सोमावल ता.तळोदा येथे तालुकास्तरीय रानभाजी महोत्सव २०२५-२६ चे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. स्थानिक रानभाज्यांचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने आयोजित या महोत्सवाचे उद्घाटन आमदार राजेश पाडवी यांच्या हस्ते झाले.

कार्यक्रमात एकूण २६ प्रकारच्या रानभाज्यांचे स्टॉल लावण्यात आले होते, ज्यात बांबू, करटोली, घोळभाजी, अंबाडी अशा अनेक भाज्यांचा समावेश होता. मान्यवरांनी रानभाज्यांचे आरोग्याच्या दृष्टीने असलेले महत्त्व विषद केले. या भाज्या पूर्णतः सेंद्रिय असल्याने सुदृढ, निरोगी व बलशाली आरोग्यासाठी त्यांचा आहारात नियमित वापर करण्याचे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.तालुका कृषी अधिकारी मीनाक्षी वळवी यांनी रानभाज्यांचे पोषणमूल्य व औषधी गुणधर्मांबाबत सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहायक कृषी अधिकारी स्वाती गावीत यांनी केले.



सोमावलचे उपसरपंच मुन्ना पाडवी, स्वीय सहायक वीरसिंग पाडवी, पोलीस निरीक्षक विवेक पाडवी,रविदास पाडवी,देविदास पाडवी, तंटामुक्त समितीचे निलेश वळवी यांच्यासह अनेक मान्यवर व ग्रामस्थ या कार्यक्रमाला उपस्थित होते. तालुका कृषी अधिकारी कार्यालयाच्या वतीने उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रम संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आले.

# नंदुरबारमध्ये विजय गौरव क्रीडा महोत्सवाचा शानदार शुभारंभ

**नंदुरबार । दिपक गोसावी**

जिल्ह्याचे नेते आणि माजी आदिवासी विकास मंत्री आमदार डॉ. विजयकुमार गावित यांच्या वाढदिवसानिमित्त विजय गौरव क्रीडा महोत्सव समितीने आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय बुद्धिबळ आणि व्हॉलीबॉल स्पर्धांचा माजी खासदार डॉ. हिना गावित आणि माजी जिल्हा परिषद अध्यक्षा डॉ. सुप्रिया गावित यांच्या हस्ते शानदार शुभारंभ झाला.

यावेळी डॉ. हिना आणि डॉ. सुप्रिया यांनी लहान मुलांसोबत बुद्धिबळ खेळून आणि व्हॉलीबॉलचा पहिला चेंडू मारून स्पर्धकांचा उत्साह वाढवला. १० ऑगस्टपासून सुरू झालेल्या या महोत्सवात चार दिवस विविध क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा निर्मितीनंतर प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणात स्पर्धा घेण्यात आल्या असून, विजेत्यांना आकर्षक पारितोषिके दिली जाणार आहेत.



यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. हिना गावित यांनी सहभागी स्पर्धकांचे आभार मानले आणि क्रीडा कौशल्याला प्रोत्साहन देण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. डॉ. सुप्रिया गावित यांनी क्रीडा महोत्सवाचे कौतुक केले आणि आमदार डॉ. विजयकुमार गावित यांच्या क्रीडा क्षेत्रातील योगदानाबद्दल प्रशंसनीय उद्गार काढले.

बुद्धिबळ स्पर्धा १२,१४, आणि १९ वर्षांखालील तसेच १९ वर्षांवरील अशा चार गटांमध्ये झाली. यात एकूण २८० खेळाडूंनी सहभाग घेतला. व्हॉलीबॉल स्पर्धा दोन दिवस चालणार आहे. १४ ऑगस्ट रोजी १८ वर्षांवरील गटासाठी मॅरेथॉन स्पर्धा आयोजित केली आहे. या कार्यक्रमाला शांताराम पाटील, दीपक पाटील, जितेंद्र पाटील, युवराज पाटील, ईश्वर धामणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# गायरान नियमित करणे व इतर प्रश्नावर न.प.सीओ फडसे यांच्यासोबत सरात्मक चर्चा–अशोक वीर

**बीड । प्रतिनिधी**

गायरान धारकांचे प्रश्न आणि मुरमाची आवश्यकता, गायरान धारकांचा विषय अजित पवार आणि डॉ. योगेश क्षीरसागर यांनी गायरान धारकांच्या समस्यांवर लक्ष केंद्रित केले आहे. बीड चे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी अतिक्रमण करणाऱ्या रहिवाशांच्या नावांची यादी मागितली आहे, ज्यामुळे गायरानावर राहणाऱ्या लोकांचे हक्क सुरक्षित करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. सर्व गायरान धारकांना पीटीआर (प्रमाणपत्र) देण्याचे आश्वासन दिले गेले आहे.ज्यामुळे त्यांची आर्थिक आणि सामाजिक स्थिती सुधारेल. चिखल झालेल्या ठिकाणी मुरमाची आवश्यकता याशिवाय, बार्शी नाका विभागातील काही भागात मुरमाची आवश्यकता असल्याबद्दल एक महत्त्वाचे निवेदन दिले गेले आहे. ढोले वस्ती, अशोक नगर, दुधाळ कॉलनी, प्रकाश आंबेडकर नगर, ढगे कॉलनी आणि इतर वसतींमध्ये रस्ते आणि सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेल्या मुरमामुळे स्थानिक नागरिकांचे जीवन सुगम होण्यास मदत होईल. रस्ते



बांधकामामुळे येथे शैक्षणिक व व्यावसायिक क्रियाकलापांना थोडी अधिक चालना मिळेल.

उपस्थित व्यक्ती

या सर्व चर्चेच्या वेळी जेष्ठ नेते आणि स्थानिक कार्यकर्ते उपस्थित होते, ज्यात अशोक वीर, सचिन बोबडे, अमोल अहिरे, बबलू पवार, शेख जमील, अशोक वाघमारे यांचा समावेश होता. त्यांच्या सहकार्याने स्थानिक समस्यांचे निराकरण करण्यात अधिक सुसंगतता आणण्याची अपेक्षा आहे.

स्थानिक विकासासाठी सर्वांची एकत्रित भागीदारी आवश्यक आहे. योग्य व तात्काळ कारवाई करून रस्ते आणि इतर विकास कार्यांना गती देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अशा कामांमुळे स्थानिक विकासाला ना केवळ धारणा मिळेल, तर रस्त्यांची स्थिती सुधारेल आणि त्याबरोबर नागरिकांच्या आरोग्यावर सकारात्मक परिणाम होईल. सर्व सहभागी व्यक्तींच्या एकजुटीमुळे आणि सुसंगत कार्यपद्धतीद्वारे स्थानिक समस्यांचे समाधान करणे शक्य होईल, हे विचारांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

# कुंबेफळ येथे विठ्ठल बिरुदेव भंडारा परज कार्यक्रम संपन्न



**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील कुंबेफळ येथे प्रती वर्षाच्या परंपरेनुसार यावर्षी रविवार रोजी श्री विठ्ठल बिरुदेवाच्या भंडाऱ्या चे आयोजन करण्यात आले.

धनगरी ओवीगायन कार्यक्रम संपन्न झाला.ढोल, झांज,अब्दागिरी व छत्री,आणि निशान पताका घेऊन सलग पाऊल खेळत ही भंडाऱ्याची उधळण करत परज निघाली. बिरुदेव वीर देवांचा हेडाम पार पडले त्यानंतर महाप्रसाद झाला या कार्यक्रमासाठी परिसरातील मोठ्या प्रमाणात वीरकरी नागरीक उपस्थित होते. गावातील ग्रामस्थ, सर्व क्षेत्रातील मंडळी मोठया संख्येने सहभागी झाले होते.कार्यक्रम यशस्वीतेसाठी गावकऱ्यांनी परिश्रम घेतले.

# बीड जिल्ह्यातील पहिले संविधान साक्षर गाव होणार

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरूर कासार येथील लोकप्रशासन शास्त्र व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने एक गाव संविधान साक्षर अभियान दिनांक १२ ऑगस्ट २०२५ रोजी कान्होबाचीवाडी तालुका शिरूर कासार येथे सकाळी ९.३० वाजता राबविण्यात आले. याप्रसंगी जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वास कंधारे हे होते तर प्रमुख उपस्थितीमध्ये गावातील शालेय समिती अध्यक्ष बाळासाहेब मोरे, उपप्राचार्य संजय तुपे, त्याच बरोबर जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक मिसाळ सर , हे होते. याप्रसंगी वारे सर, तांबे सर, सानप सर, व त्या ठिकाणचा सर्व स्टाफ मोठ्या प्रमाणावर उपस्थित होता. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी सुजाता येवले, या सुद्धा उपस्थित होत्या.

प्रथम कार्यक्रमाचे संयोजक लोकप्रशासनशास्त्र विभागाचे प्रोफेसर डॉ.विठ्ठल जाधव यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यात त्यांनी शिरूर



तालुक्यातील कान्होबाचीवाडी हे गाव संविधान साक्षरतेसाठी दत्तक घेत आहोत असे घोषित केले. त्याचबरोबर येणाऱ्या काळामध्ये गावातील प्रत्येक कुटुंबास एक संविधान ग्रंथ देऊन या कुटुंबाने त्याचं वाचन केल्यानंतर त्यांचा साक्षरता सर्वे होणार आहे. याच प्रसंगी प्राथमिक स्वरूपात ४० कुटुंबाला संविधान ग्रंथ वाटप करण्यात आला. त्यानंतर प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे यांनी प्रत्येक भारतीयांनी संविधानातीलअधिकार व कर्तव्यअंगीकारून आपले जबाबदार नागरिकाचे कर्तव्य निभावले पाहिजे असे प्रतिपादन केले. त्याचबरोबर गाव संविधान साक्षर होण्यास सर्व गावकऱ्यांनी मदत करावी. व या संविधान साक्षर अभियानात आपला मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा असे आवाहन केले. प्रत्येक भारतीयाला किमान स्वतःचे अधिकार व कर्तव्य हे कळालेच पाहिजे भारतीय संविधान हा देशाचा महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे असे यावेळी आपल्या मनोगतात स्पष्ट केले. मुख्याध्यापक मिसाळ सर यांनीही संपूर्ण गाव संविधान साक्षर होण्यास माझी शाळा, मुले व पालक हे संपूर्ण सहभाग नोंदवतील असे मत व्यक्त केले. तांबे सरांनी आभार प्रदर्शन मध्ये सातवीच्या मुलांना आपल्या नागरिक शास्त्रातील मानवाचे मूलभूत अधिकार व कर्तव्य याचे वाचन आपल्या पाल्याकडून करून घ्यावे. असे मुलांना आवाहन केले. या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयातील मुले मोठ्या संख्येने उपस्थित होती.या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते . त्याचबरोबर शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. शेवटी कार्यक्रमाचे आभार तांबे सर यांनी मानले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077